# <u>उच्च न्यायालय, मुंबई</u>

## <u>वाहनचालक पदाकरीता निवड प्रक्रिया</u>

ज्या उमेदवारांची नावे संलग्न यादीत नोंदवली आहेत, त्यांना निर्देशित केले जात आहे की त्यांनी खालील कागदप़त्रांच्या स्वत: प्रमाणित (self attested) केलेल्या छायांकित प्रती पडताळणीसाठी दिनांक **२०/०७/२०२२** किंवा त्यापूर्वी प्रबंधक (कार्मिक), उच्च न्यायालय, अपील शाखा, ५ वा मजला, नवीन मंत्रालय इमारत, जी. टी. रूग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई—४०० ००१ येथे फक्त स्पीड पोस्टाद्वारे (speed post) पाठवाव्यात. कागदप़त्रांच्या स्वत: प्रमाणित (self attested) केलेल्या छायांकित प्रती स्पीड पोस्टाव्यतिरीक्त इतर कोणत्याही माध्यमातून किंवा वरील नमुद केलेल्या दिनांकानंतर मिळाल्यास त्या स्वीकारल्या जाणार नाहीत. <u>जर कोणत्याही उमेदवाराने वरील निर्देशांचे पालन केले नाही, तर त्याची/तिची उमेदवारी पुढील निवड प्रक्रियेसाठी ग्राहय धरली जाणार नाही.</u> केवळ कागदपत्रे मागवली यावरून उमेदवारांना लेखी (स्क्रिनिंग) चाचणीसाठी उपस्थित राहण्याचा अधिकार मिळत नाही, याबाबत उमेदवाराने नोंद घ्यावी.

**उमेदवाराने (स्पीड पोस्टाद्वारे) जाहिरातीत परिच्छेद अ व फ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पाठवावयाची कागदपत्रांची यादी**

| अ. क्र | **कागदपत्रांचे तपशील** |
|---|---|
| १ | ऑनलाईन अर्जाची प्रत नोंदणी क्रमांकासहित (Printout of the online application with Registration Number) |
| २ | जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला [शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (School Leaving Certificate) / जन्म प्रमाणपत्र (Birth Certificate) / एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र (S.S.C. Board Certificate)] |
| ३ | एस.एस.सी. व एच.एस.सी परिक्षेचे गुणपत्रक आणि बोर्ड प्रमाणपत्र (Marksheets and Board Certificates of S.S.C. and H.S.C.) |

......2/-

| अ. क्र | **कागदपत्रांचे तपशील** |
|---|---|
| ४ | जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (त्यांचा हुद्दा, पत्ता व फोन नंबर सह) (ऑनलाईन जाहिरातीसोबत जोडलेल्या Form 'B' नमुन्यात) |
| ५ | वैध वाहन परवान्याची (Valid Driving License) प्रत |
| ६ | मोटार वाहन चालविण्याचे किमान ३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र. प्रमाणपत्रावर जारी करणाऱ्या संस्थेचे/व्यक्तीचे नावं, स्वाक्षरी, पत्ता तसेच संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे. |
| ७ | वाहन दुरूस्ती/देखभालीचे ज्ञान असले बाबतचे प्रमाणपत्र. प्रमाणपत्रावर जारी करणाऱ्या संस्थेचे/व्यक्तीचे नावं, स्वाक्षरी, पत्ता तसेच संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे. |
| ८ | वाहन चालविण्याचा पूर्व कार्यकाल (रेकॉर्ड) स्वच्छ असल्याबाबतचे हमीपत्र (Undertaking regarding past Clean Driving record). |
| ९ | तत्सम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी). |
| १० | महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| ११ | सेवा योजन कार्यालयात (Employment Exchange Office) नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| १२ | लहान कुटुंबा बाबत स्वयं घोषणापत्र (ऑनलाईन जाहिरातीसोबत जोडलेल्या Form 'A' नमुन्यात) |
| १३ | उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र. |
| १४ | जर नावात बदल झाला असेल तर नावाच्या बदला बाबत दस्तऐवज जसे की शासकीय राजपत्र/विवाह प्रमाणपत्राची प्रत इ. |

दस्तऐवज असलेल्या लिफाफ्यावर खालीलप्रमाणे लिहावे :

''वाहनचालक पदाकरीता अर्ज''

सही/—

दिनांक : २ जुलै, २०२२ प्रबंधक (कार्मिक)